## नियमित दिवाणी दावा क्रमांक २७५/२०१७ मधील निशाणी क्रमांक ५ वरील आदेश.

वादीने प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ३९ नियम १ व २ प्रमाणे प्रतिवादींनी दावा मिळकतींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण करू नये असा असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळणेसाठी केलेला आहे.

**अर्जातील थोडक्यात कथन खालीलप्रमाणे.**

**२.** प्रस्तुतचा दावा हा वाटप, स्वतंत्र कब्जा व जाहीर ठराव मिळण्याकरिता दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे मौजे आडगाव खुर्द येथील शेतजमीन गट नंबर १४७ क्षेत्र ६८ गुंठे व क्षेत्र १ हेक्टर २१ गुंठे, गट नंबर १३४ क्षेत्र १३ गुंठे व गट नंबर १३२ क्षेत्र ४५ गुंठे या मिळकती वादी प्रतिवादी यांच्या वडिलोपार्जित हिंदु एकत्र कुटुंबाच्या मिळकती आहेत. सदर मिळकतींमध्ये वादी प्रतिवादींचा सामुहिक कब्जा आहे. मुळ पुरूष भागवत यांच्या मृत्युनंतर वादी व प्रतिवादींच्या महसुल दप्तरी सामाईकामध्ये नोंदी झालेल्या आहेत. सदर मिळकतींमध्ये त्यांच्या मध्ये अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. वादीचा दावा मिळकतींमध्ये अविभक्त १/५ हिस्सा आहे तो वादीने प्रतिवादींकडे विभक्त करून मागितला असता त्यास प्रतिवादींनी स्पष्ट नकार दिला. प्रतिवादींनी दिनांक ३०/०८/२०१७ रोजी वादीची फसवुन हक्कसोड पत्रावर सही घेतली. वादीने दावा मिळकतीत असलेले त्यांचे हक्क कधीही सोडलेले नाही. प्रतिवादींनी तथाकथित हक्क सोड पत्र दस्ताच्या आधारे वादीचा दावा मिळकतीत असलेला हक्क नाकारून दावा मिळकतीचे हस्तांतरण करण्याची धमकी दिली. त्यामुळे वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण व विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश मिळावा अशी विनंती केली.

**३.** प्रतिवादी क्रमांक १ ने निशाणी क्रमांक १३ वर कैफियत दाखल करून अर्जास विरोध केला. त्यांनी अर्जातील सर्व कथने नाकारून पुढे असे म्हणणे दिले की, वादी व प्रतिवादीं दरम्यान १० वर्षापुर्वीच एकत्र कुटुंबाच्या मिळकतींचे तोंडी वाटप झाले होते. त्या वाटपाप्रमाणे जो तो आपआपल्या हिश्यास आलेल्या मिळकतींचा उपभोग घेत आहे. वादीच्या हिश्यास आलेली मिळकत जास्त कसदार असल्यामुळे वादीने प्रस्तुतचा खोटा दावा व मनाई हुकुमाचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे त्यांनी सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

**४.** प्रतिवादी क्रमांक २, ५ ते ९ यांना दाव्याचे समन्स लागुनही ते दाव्याकामी हजर झाले

नाहीत व त्यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दिले नाही. प्रतिवादी क्रमांक ३ व ४ यांनी दाव्याकामी हजर होऊनही प्रस्तुत अर्जास त्यांचे म्हणणे दिले नाही म्हणुन त्यांच्या म्हणण्याशिवाय प्रस्तुतचा अर्ज चालविण्यात आला.

**५.** वादीतर्फे विद्वान विधीज्ञ श्री. एस. एन. गोरे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रतिवादींतर्फे कोणीही हजर राहिले नाही. पक्षकारांच्या परस्पर विरोधी कथनांवरून खालील मुद्दे माझे विचाराधीन निश्चित करण्यात येत आहे. त्यावरील निष्कर्ष मी कारणमिंमासेसह पुढीलप्रमाणे देत आहे.

| अ. क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| **१.** | वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस आहे काय ? | ... होय. |
| **२.** | न्यायाचा समतोल वादीच्या बाजूने झुकतो काय ? | ... होय. |
| **३.** | तुर्तातुर्त मनाई आदेश न केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे काय ? | ... होय. |

## कारणमिंमासा

**६.** वादीने अर्ज पुष्ठयर्थ गट नंबर १४७, गट नंबर १३४ व गट नंबर १३२ चे ७/१२ उतारे, दिनांक ३०/०८/२०१७ रोजीचे विना मोबदला हक्क सोड पत्राची प्रमाणित प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केली. प्रतिवादींनी त्यांच्या बाजुने कोणतीही कागदपत्रे दाखल केली नाहीत.

**७.** प्रस्तुतचा दावा हा वाटप व जाहीर ठराव मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादीच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकती या वादी प्रतिवादींच्या एकत्र हिंदु कुटुंबाच्या मिळकती असुन त्यासंबंधी अद्यापपावेतो सरस निरस मानाने वाटप झालेले नाही. प्रतिवादींनी दिनांक ३०/०८/२०१७ रोजी वाटपाचा दस्त आहे असे सांगुन फसवुन वादीची हक्क सोड पत्रावर सही घेतली आहे. प्रतिवादी क्रमांक १ ते ४ हे वादीस त्याचा अविभक्त हिस्सा त्याने मागणी केल्यानंतर वाटप करून देण्यास नकार देत आहेत. तसेच त्यांनी वादीस दावा मिळकत विक्री करण्याची धमकी दिली. प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी दावा मिळकतीची विक्री केल्यास वादीचे अपरिमित नुकसान होणार आहे.

**८.** प्रतिवादी क्रमांक १ ने दावा मिळकती या वडिलोपार्जित मिळकती असल्याचे नाकारलेले नाही. तसेच प्रतिवादी क्रमांक १ ने वादीशी असलेले त्यांचे नातेसंबंध नाकारलेले नाही. परंतु त्याच्या

म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतींचे अगोदरच तोंडी वाटप झालेले असतानाही प्रतिवादीने प्रस्तुतचा खोटा दावा व अर्ज दाखल केला आहे. वादी व प्रतिवादींच्या कथनांवरून दावा मिळकत ही वडिलोपार्जित एकत्र हिंदु कुटुंबाची मिळकत आहे हे स्पष्ट होते. वादीने केलेल्या कथनांवरून व त्यांच्या तर्फे दाखल करण्यात आलेल्या दावा मिळकतींच्या ७/१२ उता-यांवरून दावा मिळकतीसंबंधी अद्यापपावेतो वादी व प्रतिवादींदरम्यान सरस निरस मानाने वाटप झालेले नाही हे प्रथमदर्शनी दिसुन येते.

**९.** वादीने पुढे प्रतिवादींनी त्यांच्याकडुन फसवुन दावा मिळकती संबंधी हक्क सोड पत्र करून घेतले आहे. सदर बाब ही प्रतिवादी क्रमांक १ ने नाकारलेली आहे. सदरचे हक्कसोड पत्र हे फसवुन करून घेतलेले आहे किंवा नाही हे पुराव्याअंती स्पष्ट होणार आहे. मात्र सकृतदर्शनी दावा मिळकतींमध्ये वादीचा अविभक्त हिस्सा आहे असे दिसुन येते. प्रतिवादी क्रमांक १ ते ४ हे दावा मिळकतींची विक्री करतील अशी धास्ती वादीस वाटत आहे. वादीचा दावा मिळकतींमध्ये अविभक्त हिस्सा असल्याने प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी जर सदर मिळकती विक्री केल्या तर निश्चितच त्यामुळे दाव्यामध्ये गुंतागुंत वाढणार आहे व वादीस सदर मिळकतींमध्ये हिस्सा देणे गुंतागुंतीचे होणार आहे. परिणामी त्यामुळे वादीचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. त्यामुळे वादीचा दावा मिळकतींमध्ये असलेला अविभक्त हिस्सा संरक्षित करण्यासाठी प्रतिवादी क्रमांक १ ते ४ च्या विरूध्द त्यांनी सदर मिळकतींचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण अथवा त्याची विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाई आदेश सदर दाव्याचा अंतिम निकाल होई पर्यंत पारित करणे आवश्यक वाटते. त्यामुळे वादीचा सदर अर्ज मंजुर करणे क्रमप्राप्त ठरते. सबब मुद्दे क्रमांक १ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** प्रतिवादी क्रमांक १ ते ४ यांनी दावा मिळकतीचे कोणत्याही प्रकारे हस्तांतरण अथवा विक्री करू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकुम दाव्याचा अंतिम निर्णय होई पावेतो देण्यात येत आहे.

**३.** अर्जाचा खर्च दाव्याच्या खर्चात समाविष्ट करण्यात येत आहे.

(सौ. स्वाती भा. नाईकनवरे - गरड)
२ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,
राहाता.

राहाता.
दिनांक :- २२/०२/२०१९.